



# हिंदुस्थान

७७ वर्ष स्नेह, विश्वास आणि परंपरेचे

पुरोगामी राष्ट्रीय विचाराचे दैनिक

www.dainikhindusthan.com
epaper.dainikhindusthan.com





■ वर्ष ७७ वे/अंक २ रा ■ ■ अमरावती, सोमवार दिनांक १७ ऑगस्ट २०२६ ■ ■ संस्थापक : कै. श्री. बाळकृष्ण विष्णू मराठे ■ ■ भारतीय सौर २६ श्रावण १९४८ ■ ■ पृष्ठे १६ ₹ ४.०० ■




# उच्च न्यायालयाच्या लिपिक टंकलेखन कौशल्य ऑनलाइन परीक्षेत गोंधळ

## अभिजीत दिपकेंचा आंदोलक विद्यार्थ्यांना पाठिंबा




छत्रपती संभाजीनगर दि. १६ : मुंबई उच्च न्यायालयाच्या लिपिक पदाच्या टंकलेखन कौशल्य ऑनलाइन परीक्षेत मोठा गोंधळ झाल्याचं छत्रपती संभाजीनगर पाहायला मिळालं. याशिवाय कल्याण, वाशिम आणि भंडारा येथे देखील परीक्षेत तांत्रिक अडचणी दिसून आलं. या परीक्षेतील गोंधळामुळं विद्यार्थींनी कोर्टाच्या आवारात आंदोलन सुरु केलं.या विद्यार्थ्यांना समर्थन देण्यासाठी सीजेपीचे संस्थापक अभिजीत दिपके दाखल झाले. याशिवाय कल्याणमधील विद्यार्थ्यांसोबत अभिजीत दिपके यांनी व्हिडीओ कॉलवर संवाद साधला.

**अभिजीत दिपके काय म्हणाले?**

मुंबई उच्च न्यायालयाच्या लिपिक पदाच्या टंकलेखन कौशल्य ऑनलाइन परीक्षेत राज्यभर गोंधळ झाला आहे. छत्रपती संभाजीनगरचं नाही तर नांदेड, कल्याण, ठाणे, नाशिक, गोंदियामध्ये ऑनलाइन परीक्षेत गोंधळ होत आहे, की बोर्ड काम करत नाही, सर्व्हर काम करत नाही. १० मिनिटात लॉग आऊट होऊन जात आहे. म्हणजेच एका शिफ्टमध्ये असलेले विद्यार्थी फेल झाले. एवढा सगळा गोंधळ असताना ही परीक्षा कशी होऊ शकते, त्यामुळं ही परीक्षा पुन्हा घेतली गेली पाहिजे, असं अभिजीत दिपके यांनी म्हटलं. हा मुद्दा फक्त संभाजीनगरचा राहिलेला नाही, राज्याचा मुद्दा झाला आहे. जोपर्यंत फेरपरीक्षा घेण्याबाबत नोटिफिकेशन काढलं जात नाही आणि विद्यार्थ्यांना हार्डकॉपी मिळाली पाहिजे. परीक्षा देणारे विद्यार्थी बसून राहणार असतील तर मी देखील बसून राहणार असल्याचं अभिजीत *(उर्वरित पान २ वर)*

# भारताची तुलना इतर देशांशी नको; जगाला दिशा देण्याची जबाबदारी आपली : सरसंघचालक

नागपूर दि. १६ : भारताने अमेरिका, चीन किंवा ऑस्ट्रेलियाशी स्वतःची तुलना करण्यापेक्षा आपल्या संस्कृती, मूल्ये आणि गरजांच्या आधारे विकासाची दिशा ठरवावी. जग आज अपूर्ण दृष्टीमुळे धडपडत आहे. त्यामुळे जगाला पुढील मार्ग दाखविण्याची जबाबदारी भारताची आहे. देशातील तरुण पिढीने साहस, कर्मशीलता, त्याग व शौर्याच्या बळावर स्वतःला तयार करावे, असे आवाहन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी केले.



स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने नागपुरातील ऐतिहासिक कस्तुरचंद पार्क मैदानावर नागपूर महानगरपालिकेच्या सहकार्याने 'लोकमत' वृत्तपत्र समूहाने उभारलेल्या २०० फूट उंच राष्ट्रध्वजाचे डॉ. मोहन भागवत यांच्या हस्ते शनिवारी सकाळी ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर आयोजित विशेष कार्यक्रमात 'भारताच्या उज्वल भविष्यात युवकांचे योगदान' या विषयावर त्यांनी तरुणांना मार्गदर्शन केले.

लोकमत' एडिटोरियल बोर्डाचे चेअरमन तथा माजी राज्यसभा खासदार डॉ. विजय दर्डा यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी डॉ. विजय दर्डा, महापौर नीता ठाकरे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

भारत स्वातंत्र्याच्या ८०व्या वर्षात प्रवेश करत असताना हा प्रसंग आत्मचिंतनाचा आहे. भारताचे स्वातंत्र्य टिकणार नाही, अशी भाकिते काहींनी केली होती. मात्र, अनेक पिढ्यांनी स्वतःच्या हिताचा त्याग केला आणि देशासाठी काम केले. त्यामुळे आज आपण भविष्याचा विचार करू शकत *(पान २ वर)*

# राज्यात १,४४० डॉक्टरांची नियुक्ती लवकरच

मुंबई दि. १६ : राज्यात येत्या काही दिवसांत १,४४० डॉक्टरांची नियुक्ती करण्यात येणार आहे.




तसेच आणखी ६०० डॉक्टरांसाठी जाहिरात काढण्यात आलीय.सुमारे २५० दंतचिकित्सकही लवकरच आरोग्य सेवेसाठी उपलब्ध होतील, अशी माहिती आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिली. आरोग्य व्यवस्था अधिक बळकट करण्यासाठी निधीची कमतरता भासू दिली जाणार नाही, असेही त्यांनी सांगितले.

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या महिला आरोग्य समिती, जन आरोग्य समिती आणि रुग्णकल्याण समितीच्या सदस्यांशी आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी ऑनलाइन पद्धतीने *(उर्वरित पान २ वर)*

# काँग्रेसच्या मुख्यालयात पाप घडलंय जनता माफ करणार नाही : अमित शाह

नवी दिल्ली दि.१६ : काँग्रेस कार्यालयातील एका घटनेवरून जोरदार राजकारण पेटलं आहे. या घटनेच्या विरोधात भाजपने जोरदार टीका केली. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी देखील याच मुद्द्यावरून काँग्रेस आणि खासदार सोनिया गांधी यांच्यावर हल्लाबोल केला आहे. त्यांनी राजस्थानच्या एका सभेत वंदे मातरमवरून काँग्रेसवर टीका केली. काँग्रेस कार्यालयात पाप घडलं आहे. वंदे मातरम गीत अर्ध्यात थांबवण्यात आलं. त्यामुळे जनता सोनिया गांधी यांना कधीच माफ करणार नाही. राष्ट्रगीत अपूर्ण ठेवण्याचे कोणी स्वप्नातही विचार करू शकतो का? काँग्रेसच्या लोकांना लाज वाटली पाहिजे, अशा शब्दात अमित शहा यांनी टीका केली.



अमित शहा यांनी पुढे म्हटलं की, काँग्रेस निर्लज्ज झाली आहे. काँग्रेसच्या मुख्यालयात वंदे मातरम गीत सुरू होतं. त्याचवेळी सोनिया गांधी यांनी मल्लिकार्जुन खर्गे यांना गीत रोखण्यास म्हटलं. आम्ही सर्व टीव्हीवर पाहत होतो. ८० वर्षांच्या बंकिम चंद्र चट्टोपाध्याय यांच्या गीताला पुन्हा सन्मान मिळत आहे. परंतु सोनिया गांधी यांना आवडलं नाही. सोनिया गांधी यांना १४० कोटी लोक बघत आहेत'.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी पुढे म्हटलं की, 'तुम्ही चूक केली आहे. त्यामुळे देशाची जनता माफ करणार नाही. ही बाब कोणी स्वप्नातही विचार करू शकत नाही. काँग्रेसला लाज वाटली पाहिजे. थोडीतरी लाज शिल्लक राहिली असेल, तर दोन्ही हात जोडून बंकिम बाबू आणि देशाच्या जनतेची माफी मागितली पाहिजे'.

वंदे मातरम गीत रोखण्याच्या कथित वादावर काँग्रेसने स्पष्टीकरण दिलं आहे. 'सोनिया गांधी फक्त मल्लिकार्जुन खर्गे यांच्यासाठी खुर्ची मागत होत्या'. काँग्रेसवर टीका करताना भाजप खासदार सुधांशु त्रिवेदी म्हणाले, 'पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा संकल्प आणि भारतीयांच्या भावना लक्षात घेऊन स्वातंत्र्य दिनाच्या दिवशी पहिल्यांदा वंदे मातरम गीत पूर्ण गायले गेले'. भाजपचे आयटी सेलचे प्रमुख अमित मालवीय यांनी सोशल मीडियावर पोस्ट करून सोनिया गांधी यांच्यावर टीका केली आहे. 'वंदे मातरमच्या सुरुवातीच्या ओळींनी सोनिया गांधी नाराज झाल्या. त्यांनी संपूर्ण गीत वाजवू दिले नाही. राहुल गांधी यांनीही थांबवण्याचा इशारा दिला, असा आरोप मालवीय यांनी केला.

# 'जेन झी'सोबत राहुल गांधी शड्डू ठोकणार

## राहुल गांधींचा २ दिवसीय महाराष्ट्र दौरा

मुंबई दि. १६ : राज्यात सध्या कोणतीही निवडणूक तोंडावर नसताना काँग्रेस पक्षानं आपली रणनीती पूर्णपणे बदललीय.. पक्षाने थेट 'अलर्ट मोड'वर येत सत्ताधाऱ्यांना इशारा दिलाय...राहुल गांधी २ दिवसीय महाराष्ट्र दौऱ्यावर आहेत. नाशिकमध्ये १० दिवसीय विशेष निवासी प्रशिक्षणाचं आयोजन काँग्रेसनं केलयं... त्यामुळे जेन झींना सोबत घेऊन राहुल गांधी आता शड्डू ठोकणार असल्याची चर्चा आहे...आणि त्याला कारण



ठरलयं...राहुल गांधींच्या उपस्थित होणारं सृजन अभियान... हे अभियान नेमकं काय आहे? आणि राहुल गांधी महाराष्ट्रातील तरुणांशी कसं कनेक्ट होणार आहेत.

काँग्रेसनं नाशिकमध्ये १० दिवसाचं सृजन अभियान सृजन अभियानाचं आयोजन केलयं... या अभियानात जेन नच्या प्रश्नांवर विशेष भर दिला जाणार आहे... देशभरातील तरुणांना पक्षाशी जोडून घेण्यासाठी काँग्रेसनं ही रणनिती आखलीय... विशेष म्हणजे या अभियानासाठी राहुल गांधी नाशिक दौऱ्यावर येणार आहेत. ते जेन झी सोबत संवाद साधतील..तसचं राहुल गांधी काळाराम मंदिर, त्र्यंबकेश्वर ज्योतिर्लिंगाचं दर्शन घेणार असल्याचीही माहिती आहे...

जंतरमंतरवरील विद्यार्थ्यांच्या आंदोलनाने केंद्र सरकारला आधीच हादरवून *(उर्वरित पान २ वर)*

# मराठ्यांपुढे सत्तेचे शहाणपण जमत नाहीत : मनोज जरांगे

जालना दि. १६ : मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर जरांगे पाटलांनी मराठा समाजातील अभ्यासकांची महत्त्वाची बैठक पार पडल्यानंतर पत्रकारांशी बोलताना राज्य सरकार आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर हल्लाबोल केला आहे. मराठ्यांपुढे सत्तेचं शहाणपण जमत नाही, आता आमच्या बाया चपला काढतील असा घणाघात मनोज जरांगे यांनी केला.



अभ्यासकांच्या बैठकीविषयी बोलताना मनोज जरांगे पाटील म्हणाले की, जेवढे मराठ्यांचे अभ्यासक आले होते त्यांच्याशी चर्चा केली. हैदराबाद गॅझेटिअरनुसार काय बदल करायचा आणि सातारा, कोल्हापूर, पुणे आणि बॉम्बे गॅझेटिअरनुसार जीआर कसा काढायचा यावर साधक-बाधक चर्चा झाली. मी ५८ लाख नोंदींचं प्रमाणपत्र घेणार. नोंदी मी शोधलेल्या नाहीत, सरकारने शोधल्या आहेत. ज्यांचे प्रमाणपत्र निघाले त्यांची व्हॅलिडीटी मिळाली पाहिजे. हैदराबाद गॅझेटिअरनुसार मराठवाड्यात संख्येच्या प्रमाणाप्रमाणे प्रमाणपत्र दिले आहेत. याशिवाय अण्णासाहेब पाटील विकास महामंडळाच्या *(पान २ वर)*

# दुचाकीच्या भीषण अपघातामध्ये दोघांचा मृत्यू

## तीन वर्षांच्या चिमुरडीचा समावेश; तीन गंभीर जखमी

अमरावती दि.१६ : अमरावती ते कुऱ्हा मार्गावरील विरगव्हाणपासून काही अंतरावर दोन दुचाकींमध्ये समोरासमोर जोरदार टक्कर झाली. या भीषण अपघातात तीन वर्षाच्या चिमुरडीसह दोन जण ठार, तर तिघे गंभीर जखमी झाले. हा भीषण अपघात आज रविवारी, १६ ऑगस्टला सकाळी ११ वाजताच्या सुमारास कुऱ्हा पोलीस स्टेशन अंतर्गत विरगव्हाण पासून काही अंतरावर घडला. वेगाने जात असलेल्या दोन दुचाकी समोरासमोर जोरदार आदळल्याने हा अपघात घडला.

प्राप्त माहितीनुसार कुऱ्हा येथून अमरावतीच्या दिशेने धिरज तायडे हे आपल्या पत्नी व तिन वर्षी मुलगी सोबत दुचाकी शाईन मोटरसायकल ने अमरावतीकडे येत असतांना अमरावती वरून आर्वीकडे जाणारी बुलेट या दोन दुचाकींमध्ये जोरदार धडक झाली. भरधाव वेगात असलेल्या या दोन्ही दुचाकी *(उर्वरित पान २ वर)*

## माहोल....




परत अभिजित आंदोलन करायला बसला तर मला घरी बसावे लागेल...परीक्षा व्यवस्थित घेत जा ना यार!

# आज महाराष्ट्रासह अनेक राज्यांमध्ये मुसळधार पावसाची शक्यता

नवी दिल्ली दि. १६ : भारतीय हवामान विभागाने सोमवारीसाठी देशातील अनेक राज्यांसाठी मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा इशारा जारी केला आहे. पश्चिम बंगाल आणि ओडिशा या राज्यांमध्ये मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. त्याशिवाय महाराष्ट्र आणि गोव्यातही अतिमुसळधार पावसाची शक्यता वर्तवली आहे.

बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या कमी दाबाच्या पट्ट्यामुळे पुढील ४८ तासांत हवामानात मोठे बदल होणार आहेत. या हवामान प्रणालीचा प्रभाव केवळ पूर्व भारतातच नव्हे, तर देशातील इतरही अनेक राज्यांवर दिसून येणार आहे. यामुळे सखल भागात पाणी *(उर्वरित पान २ वर)*











ऑफर ऑफर ऑफर
एक्सचेंज ऑफर
जुनी कोणतीही गादी
आणा व नवीन गादीवर
२०% सुट मिळवा
ओम फर्निशिंग
सतीधाम मंदिर जवळ,
रायली प्लॉट, अमरावती
9422190292

